आनंद सागर मंगल कार्यालय

शाकाहारी करिता



एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.

* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम

आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

जलसेवा



अंकुश पाटील
श्रीराम कॉम्प्लेक्स, आसना बायपास कॉर्नर, सांगवी (बु.) नांदेड-४३१६०५
9767109771, 7767909771

* वर्ष ६५ वे * अंक २९६ * नांदेड * शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

NOVEMBER
6

जन्मदिनाच्या या खास दिवशी,
तुमच्या जीवनात सुंदर स्वप्नांच्या
रंगांची उधळण होवो..!
तुमचं जीवन हसऱ्या चेहऱ्यांनी आणि
आनंदाने भरलेले असो.
वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा...!

जीवेत शरदः शतम्





डॉ.डब्ल्यु. आर.मुजावर
मा. प्राचार्य, जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय,सिडको, नवीन नांदेड





महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक तांडा वस्ती, संपर्क अभियान भाजपा व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक

अॅड.श्रीनिवास नानासाहेब जाधव

यांच्या वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !



शुभेच्छुक

• इरफान मुजावर • रिहान मुजावर

* सेवा पेट्रोलियम चैतन्य नगर नांदेड
* मुजावर पेट्रोलियम भोकर फाटा नांदेड
* सर्वोदया एज्युकेशनल अँड व्हालंटरी असोसिएशन (सेवा)नांदेड

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

प्रकाशाचा उत्सव: अज्ञानाचा नाश

मानवाच्या उत्क्रांतीपासूनच प्रकाशाने त्याला भुरळ घातली आहे. आकाशातील सूर्य, चंद्र आणि चांदण्या असोत किंवा अग्नीचा शोध असो, प्रकाशाने मानवी जीवनाला दिशा, सुरक्षितता आणि ऊर्जा दिली. आज विजेच्या दिव्यांपासून सौरऊर्जेपर्यंत प्रकाशाची साधने बदलली असली, तरी प्रकाशाबद्दलचे मानवी आकर्षण कायम आहे. म्हणूनच भारतीय संस्कृतीत 'दीपावली' हा केवळ दिव्यांचा उत्सव न राहता जीवनदृष्टीचा उत्सव बनला आहे. अंधारावर प्रकाशाचा, अज्ञानावर ज्ञानाचा आणि असत्यावर सत्याचा विजय हा दीपावलीचा व्यापक संदेश आहे. 'दीपावली' म्हणजे दिव्यांची ओळ. मात्र, या दिव्यांची खरी ज्योत बाहेर नव्हे, तर माणसाच्या अंतःकरणात प्रज्वलित होणे आवश्यक आहे. बृहदारण्यक उपनिषदातील 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही प्रार्थना केवळ भौतिक अंधारातून प्रकाशाकडे नेण्याची विनंती नाही. अज्ञान, अविद्या, अहंकार, लोभ, द्वेष आणि संकुचितपणाच्या अंधारातून आत्मज्ञान, विवेक आणि माणुसकीच्या प्रकाशाकडे जाण्याचा तो मार्ग आहे. भारतीय चिंतनात अग्नीला म्हणूनच विशेष स्थान आहे. ऋग्वेदाचा प्रारंभ 'अग्नी' या शब्दाने होतो. भगवद्गीतेत 'ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते' असे सांगताना ज्ञानाची तुलना अग्नीशी केली आहे. अग्नी स्वतः प्रकाश देतो आणि इतरांनाही उजेड देतो. त्याची ज्योत उर्ध्वगामी असते. ज्ञानाचेही स्वरूप तसेच आहे. संत नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' अशी केलेली प्रार्थना ही याच अंतःप्रकाशाची आठवण करून देते. दीपावलीचा हा प्रकाश केवळ आध्यात्मिक नाही; त्याला आपल्या कृषी संस्कृतीची भक्कम पार्श्वभूमी आहे. पावसाळा संपतो, शेतात नवे पीक उभे राहते, सुगीचे दिवस येतात आणि कष्टकरी शेतकरी आपल्या श्रमाचे फळ अनुभवतो. निसर्गाने दिलेल्या समृद्धीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा काळ आहे. म्हणूनच दिवाळीच्या परंपरांमध्ये शेती, पशुधन, पीक आणि ग्रामीण जीवन यांचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसते. वसुबारस म्हणजे गोवत्सद्वादशीपासून दीपोत्सवाला सुरुवात होते. गाय आणि वासराची पूजा करून कृषी जीवनातील पशुधनाचे महत्त्व अधोरेखित केले जाते. भारतीय शेतकऱ्याच्या जीवनात गाय ही केवळ उपजीविकेचे साधन नाही, तर कुटुंबाचा आणि शेतीचा आधार आहे. तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा ही निसर्ग आणि पशुधनाशी असलेल्या भारतीय समाजाच्या नात्याची साक्ष आहे. लक्ष्मीपूजनातही 'धन' या संकल्पनेचा व्यापक अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्यासाठी त्याचे शेत आणि त्यातील पीक हेच खरे धन, तर व्यापाऱ्यासाठी व्यवसायाची भरभराट ही समृद्धीची खूण. त्यामुळे लक्ष्मी-कुबेर पूजन हे केवळ संपत्ती मिळविण्याची इच्छा नसून श्रमातून निर्माण झालेल्या समृद्धीबद्दलची कृतज्ञता आहे. बलिप्रतिपदेचा संदेश तर अधिकच महत्त्वाचा आहे. लोककल्याणकारी आणि दानशूर बळीराजाच्या स्मरणातून ग्रामीण समाज आजही 'इडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो' अशी प्रार्थना करतो. या प्रार्थनेत न्याय, समता, समृद्धी आणि सामान्य माणसाच्या कल्याणाची आकांक्षा दडलेली आहे. म्हणूनच बळीराजाचे स्मरण ही केवळ परंपरा नसून लोककल्याणाच्या मूल्यांची आठवण आहे. दिवाळीपूर्वी घराची स्वच्छता करण्याची परंपराही अर्थपूर्ण आहे. बाहेरील कचरा दूर करण्याबरोबरच मनातील मत्सर, द्वेष, अहंकार आणि नकारात्मकता दूर करण्याची प्रेरणा या स्वच्छतेतून मिळते. दिवा लावणे म्हणजे घर उजळणे एवढेच नव्हे; तर मनातील अंधार दूर करण्याचा संकल्प करणे होय. कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्र एकत्र येतात, गोडधोड वाटले जाते, भेटीगाठी होतात. त्यामुळे सामाजिक ऐक्य आणि परस्परांतील जिव्हाळाही दृढ होतो. यंदाची दीपावली मात्र महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या वेदना विसरून साजरी करता येणार नाही. अनावृष्टी आणि नैसर्गिक संकटांनी अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. शासनाकडून पूरग्रस्त आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाली असली, तरी संकटग्रस्त कुटुंबांना आधाराची गरज केवळ एका मदतीपुरती मर्यादित नसते. अन्नदात्याच्या घरात दिवा तेव्हाच खऱ्या अर्थाने उजळेल, जेव्हा त्याच्या कष्टाला सुरक्षितता आणि श्रमाला योग्य मोबदला मिळेल. म्हणून या दीपावलीत आपल्या घरासोबत एखाद्या गरजूचे घरही उजळवण्याचा संकल्प करूया. आनंद वाटल्यानेच तो वाढतो. एका कुटुंबाला मदतीचा हात, एका शेतकऱ्याला आधार, एखाद्या गरजू मुलाला शिक्षणासाठी मदत किंवा एखाद्या निराधार व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य आणणे, हीच आजच्या काळातील खरी दीपज्योती आहे. दीपावलीचा प्रकाश आकाशात झळकणाऱ्या फटाक्यांपुरता मर्यादित न राहता मनामनांत माणुसकीचा दीप प्रज्वलित करणारा ठरावा. अज्ञानाचा अंधार दूर होवो, द्वेषाची सावली नाहीशी होवो, श्रमाला प्रतिष्ठा मिळो आणि समाजातील प्रत्येक घरात सुख, शांती व समृद्धी नांदो, हीच 'तमसो मा ज्योतिर्गमय' या प्रार्थनेची खरी फलश्रुती ठरो. सर्वांना प्रकाशमय, आनंददायी आणि समृद्ध दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

दानाचे महत्त्व सांगणारी 'धनत्रयोदशी'!



धनत्रयोदशीच्या दिवशी सोने विकत घेण्याचा प्रघात पूर्वापार चालत आला आहे. मागील २-३ वर्षांपासून सोन्याचे भाव गगनाला भिडले असतानाही धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर सोने विकत घेणाऱ्यांमध्ये मात्र कमतरता आलेली नाही. या दिवशी सोने विकत घेतल्यामुळे वर्षभर धनलक्ष्मी आपल्या घरात वास करते असा समज आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी वर्षभराचा जमाखर्च द्यायचा असतो.

पूर्वी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेले धन धार्मिक आणि सत्कार्यात व्यय केले जात असे त्यामुळे दान करणाऱ्याच्या घरात नेहमीच धनलक्ष्मी लक्ष्मीरुपाने वास करत असे. अर्थात कमावलेले धन कोणाकडून ओरबाडून घेतलेले किंवा अन्य कोणाच्या कष्टाचे नसावे. स्वतः मेहेनत करून कमावलेले धनच फलद्रुप होते. पूर्वीचे राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्रे दान करून रिता करायचे. मंदिरांना, आश्रमांना, गुरुकुलांना, गोशाळांना आणि गरजवंतांना ते धन दान करायचे. या दानातून त्यांना अलौकिक समाधान मिळायचे. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते.

राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा विश्वस्त आहे ही भावना त्यावेळी राजांमध्ये असे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता स्वतःहून तो राजदरबारी देत असे. त्यामुळे साहजिकच पुन्हा खजिना भरत असे. पूर्वीचे राजे हे सात्विक प्रवृत्तीचे आणि प्रजाहितदक्ष असत त्यामुळे राज्यात कधी स्वार्थ बोकाळत नसे. पूर्वीच्या राजांची तुलना आताच्या राजकारण्यांशी केल्यास आताचे बहुतांश राजकारणी हे केवळ स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या हिताला प्राधान्य देणारे असतात. जनतेची सेवा करण्यासाठी म्हणून निवडणूक लढवायची आणि निवडून आल्यावर मात्र त्याच जनतेकडे सोयीस्करपणे पाठ करायची.

सत्तेची खुर्ची आली की तिचा उपयोग आपली तिजोरी भरण्यासाठी करायचा. निवडणुकीत व्यय केलेला पैसा दहापटीने वसूल करायचा. जोपर्यंत खुर्ची आहे तोपर्यंत आपल्या पुढच्या कित्येक पिढ्या बसून खातील इतके धन गोळा करायचे. जनतेला स्वधन देणे सोडा पण विविध योजनांतून जनतेला सरकारी तिजोरीतून मिळणाऱ्या धनावर सुद्धा यांचा डोळा असतो.

माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी देशातील भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते 'सामान्य लोकांच्या योजनांसाठी दिल्लीतून निघालेल्या १०० रुपयांपैकी सामान्य लोकांपर्यंत केवळ १० रुपयेच पोहोचतात.' उरलेले ९० रुपये स्वार्थांध राजकारणी आणि प्रशासकीय अधिकारी लाटतात. निवडणूक जवळ आली की, महिनाभर मतदार नागरिकांच्या हातापाया पडायचे, पैसे, भेटवस्तू, खाद्य आणि मदिरा यांच्या मोबदल्यात त्यांचे मत आपल्या पदरी पाडायचे आणि उरलेले ४ वर्ष ११ महिने सत्तेचा मलिदा लाटायचा. धनतेरस खऱ्या अर्थाने स्वार्थापासून, धनाच्या लालसेपासून दूर राहण्याची शिकवण देते. ही शिकवण पूर्वीचे राजे आचरणात आणत असत. त्यामुळे भारतीय संस्कृतीचे गोडवे आजही जगभरात गायले जातात.

आज अनेकांचे आयुष्य पैसा कमावण्यात आणि त्यांचा संचय करण्यात व्यय होते. उतारवयात जेव्हा शरीर साथ देईनासे होते तेव्हा आयुष्यात दानधर्म, पुण्यकर्म न केल्याचा पश्चाताप होतो. धनतेरस आपल्याला धनाचा संचय करण्याचा नव्हे तर सन्मार्गाने कमावलेले धन सत्कार्यात व्यय करण्याची शिकवण देते. ज्याप्रमाणे ज्ञान इतरांना दिल्याने वाढते त्याप्रमाणे सत्पात्रे दान केल्यास घरात लक्ष्मीचा वास चिरंतर राहतो. यंदा धनत्रयोदशी साजरी करताना त्यामागील अर्थ समजून घेऊन ती साजरी करूया !

–जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

राज्यातील धरणांतील पाणीसाठा चिंताजनक



महाराष्ट्रात यंदा पावसाने ओढ दिल्याने राज्यातील जलसाठ्यांवर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. राज्यातील सहाही विभागांमधील प्रमुख धरणांच्या पाणीसाठ्याची सद्यस्थिती पाहता, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाण्याची उपलब्धता कमी असल्याचे स्पष्ट होते. राज्यातील धरणांमध्ये आजच्या तारखेला एकूण ६६.७६ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गतवर्षी याच कालावधीत हा साठा ९०.३५ टक्के होता. म्हणजेच, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठ्यात २३.५९ टक्क्यांची घट झाली आहे. पिण्याचे पाणी, शेती, उद्योग आणि दैनंदिन गरजा यांचा समतोल राखताना उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा लागणार आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे, जलसाठ्यांचे योग्य व्यवस्थापन करणे आणि भविष्यातील संभाव्य टंचाईचा विचार करून आतापासूनच उपाययोजना करणे, ही काळाची गरज बनली आहे.

सरकारने बैठका घेऊन नियोजन सुरू केले आहे. पण, प्रशासनाकडून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. राज्यातील नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे आणि कोकण या सहा विभागांतील धरणांच्या पाणीसाठ्याचा आढावा घेतल्यास परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. सर्वच विभागांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा कमी आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील धरणांमध्ये आजच्या तारखेला केवळ ३९.४५ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी याच कालावधीत हा साठा ८८.११ टक्के होता. त्यामुळे या विभागातील पाणीसाठ्यात मोठी घट झाली आहे. मराठवाड्यातील अनेक भागांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने ही समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक बनत असेल, तर ही केवळ पाणीटंचाईची समस्या नसून भविष्यातील जलसुरक्षेचा गंभीर प्रश्न आहे. पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन असताना त्याच्या उपलब्धतेबाबत योग्य नियोजन करण्यात आपण कितपत यशस्वी झालो आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. राज्यातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण, पावसाचे वितरण आणि पाण्याचा वापर यामध्ये मोठी तफावत दिसून येते. त्यामुळे धरणांतील पाणीसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही काळाची गरज बनली आहमहाराष्ट्रात शेती, उद्योग, पिण्याचे पाणी आणि वीज निर्मितीसाठी धरणांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. मात्र, पावसाचे अनिश्चित स्वरूप, हवामान बदल, वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे जलसाठ्यांवर ताण वाढत आहे. काही भागांत अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, तर काही भागांत पुरेसा पाऊस न झाल्याने दुष्काळाचे संकट उभे राहते. पावसाचे पाणी साठवून त्याचा वर्षभर योग्य वापर करण्यासाठी प्रभावी नियोजनाची आवश्यकता आहे. धरणांतील पाणीसाठा कमी झाल्याचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होतो. सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध न झाल्यास रब्बी हंगामातील पिकांचे नियोजन कोलमडते.

शेतकऱ्यांना विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोतांवर अवलंबून राहावे लागते. भूजलपातळी खालावल्याने शेतीचा खर्च वाढतो. परिणामी उत्पादन खर्च आणि उत्पन्न यातील तफावत वाढून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो. त्यामुळे धरणांतील पाण्याचे वितरण करताना शेती, पिण्याचे पाणी आणि इतर गरजा यांचा समतोल राखणे आवश्यक आहपाण्याची उपलब्धता मर्यादित असताना त्याचा अमर्याद वापर करणे भविष्यासाठी धोकादायक आहे. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची गळती, शेतीमध्ये पारंपरिक सिंचन पद्धती आणि पाण्याचा अनावश्यक वापर यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींचा वापर वाढविणे आवश्यक आहे. तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यावर भर दिला पाहिजे. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, ही जाणीव समाजाच्या प्रत्येक घटकात निर्माण झाली पाहिजे.केवळ मोठी धरणे बांधून पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी गावपातळीवर जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. शेततळी, नाला खोलीकरण, बंधारे, गाळ काढणे, पावसाचे पाणी साठविणे आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजनांना प्राधान्य दिले पाहिजे.

पाणलोट क्षेत्र विकासाच्या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याचे प्रमाण वाढविता येऊ शकते. प्रत्येक गावाने स्वतःचा जलआराखडा तयार करून उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहधरणांतील पाणीसाठ्याची माहिती नियमितपणे जनतेपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. कोणत्या धरणात किती पाणी उपलब्ध आहे, त्याचा किती वापर अपेक्षित आहे आणि भविष्यातील गरजा काय आहेत, याबाबत पारदर्शकता असली पाहिजे. पाणीवाटपाचे नियोजन करताना स्थानिक परिस्थिती आणि नागरिकांच्या गरजांचा विचार केला पाहिजे. त्याचबरोबर नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. पाण्याचा प्रश्न हा केवळ सरकारचा किंवा प्रशासनाचा विषय नाही, तर तो समाजातील प्रत्येक व्यक्तीशी संबंधित आहे. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा पाणी उपलब्ध असतानाच त्याचे योग्य नियोजन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

धरणांतील पाणीसाठा, भूजलपातळी आणि पावसाचे प्रमाण यांचा अभ्यास करून दीर्घकालीन जलव्यवस्थापन धोरण आखले पाहिजराज्यातील धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक होण्याची वेळ येऊ नये, यासाठी आजपासूनच ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण, पुनर्वापर आणि जनजागृती या चार सूत्रांवर जलव्यवस्थापनाची दिशा ठरली पाहिजे. कारण पाणी असेल तर शेती असेल, उद्योग असतील आणि जीवनही असेल. अन्यथा भविष्यात पाण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ येऊ शकतयंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने धरणांमध्ये अपेक्षित प्रमाणात पाण्याची आवक झाली नाही. पिण्याचे पाणी, शेती, उद्योग आणि इतर गरजांसाठी पाण्याचा उपसा होत असल्याने जलसाठ्यात घट होत जाते.पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा टंचाई निर्माण होण्यापूर्वीच नियोजन केल्यास त्याचा अधिक फायदा होऊ शकतो. शहरी भागांमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी पाणीगळती रोखणे, जलवाहिन्यांची नियमित तपासणी करणे आणि पाण्याचा अनावश्यक वापर कमी करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागांमध्येही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी ग्रामपंचायती आणि संबंधित यंत्रणांनी आतापासूनच नियोजन करणे गरजेचे आहे.

राज्यातील बहुतांश भागांमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीसाठी पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. मात्र, पाणीसाठा कमी असताना शेतीसाठी पाण्याचा वापर करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. धरणांमधील पाणीसाठा कमी असताना केवळ उपलब्ध पाण्याचा वापर नियंत्रित करणे पुरेसे नाही. भविष्यात पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणेही आवश्यक आहे. शासनाचे त्याकडे लक्ष असले तरी प्रत्यक्ष कृती अपेक्षित आहे. पाण्याचे संकट येण्याची वाट पाहण्यापेक्षा पाणी वाचविण्याचा संकल्प आजच करूया; कारण पाण्याचा प्रत्येक थेंब हा भविष्याचा अनमोल ठेवा आहे!

–प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर
मो. ७८८८२९७८५९

दिवाळी : अंर्तमनातील प्रकाशपर्व



दिवाळी म्हटली की डोळ्यांसमोर येतात ते आकाशकंदील, पणत्यांची रोषणाई, रांगोळ्या, फराळाचा दरवळ आणि आनंदाचा उत्साह.परंतु दिवाळीचा खरा अर्थ केवळ बाह्य सजावटीत आणि उत्सवाच्या आनंदात सामावलेला नव्हे. दिवाळी हा माणसाच्या अंतर्मनाला प्रकाशमान करणारा, आत्मपरीक्षणाची जाणीव करून देणारा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा आध्यात्मिक उत्सव आहे. बाहेरच्या अंधाराला पणतीने दूर करता येते; पण मनातील अज्ञान, अहंकार, मत्सर, द्वेष आणि स्वार्थाचा अंधार दूर करण्यासाठी ज्ञानाचा आणि विवेकाचा दीप प्रज्वलित करावा लागतो.

भारतीय संस्कृतीत प्रकाशाला ज्ञानाचे,तर अंधाराला अज्ञानाचे प्रतीक मानले आहे. उपनिषदातील 'तमसो मा ज्योतिर्गमय'अथवा 'अतः दीप भवः' हा तथागतांचा संदेश प्रार्थना, संतांची बोधवचने दिवाळीच्या आध्यात्मिक अर्थाचा गाभा सांगते. अंधारातून प्रकाशाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे, असत्यातून सत्याकडे आणि मृत्यूतून अमरत्वाकडे जाण्याची ही जीवनदृष्टी आहे. त्यामुळे, दिवाळी म्हणजे केवळ घराच्या उंबरठ्यावर दिवे लावणे नव्हे, तर आपल्या विचारांच्या उंबरठ्यावरही विवेकाचा दीप लावणे होय.

दिवाळीतील प्रत्येक दिवसाला धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे.धनत्रयोदशी तून उत्तम आरोग्य हेच धन, अभ्यंगस्नानातून शरीरशुद्धीचा, वसुबारेसेतून पशुधन संवर्धनाचा, लक्ष्मीपूजनातून श्रम, समृद्धी आणि सदाचाराचा, तर बलिप्रतिपदेतून दानशीलता आणि उदारतेचा संदेश मिळतो. भाऊबीज नात्यांमधील प्रेम, विश्वास आणि आपुलकी दृढ करते. या परंपरांकडे केवळ कर्मकांड म्हणून न पाहता त्यामागील जीवनमूल्ये समजून घेणे आवश्यक आहे.

आजच्या काळात माणसाच्या घरात प्रकाशाची कमतरता नाही. मात्र,मनामध्ये अंधार वाढताना दिसतोय.छोट्या छोट्या गोष्टीतून स्पर्धा, असूया, स्वार्थ, द्वेष आणि अहंकारामुळे माणूस माणसापासून दूर जात आहे.अशा परिस्थितीत दिवाळीचा आध्यात्मिक संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो.गरजूंना मदत करणे आणि मनातील कटूता दूर करणे, हीच खरी दिवाळी ठरू शकते. दिवा स्वतः जळतो आणि इतरांना प्रकाश देतो. त्याचप्रमाणे, माणसाणे स्वतःच्या जीवनात सद्विचारांची ज्योत तेवत ठेवून समाजातील अंधारलेल्या वाटा उजळायला हव्यात. आपल्या अंत:करणातील माणुसकी जागृत करणे, हाच या दिवाळी सणाचा अध्यात्मिक हेतू आहे.

शेवटी दिवाळीचा उत्सव तेव्हाच साजरा होईल; जेव्हा पणत्याच्या प्रकाशाबरोबर माणसांच्या मनातील मळभ दूर होईल.घर उजळण्यापेक्षा मनं उजळणे, संपत्ती वाढविण्यापेक्षा सदगुण, विचार, आचरण, कृतीची श्रीमंती आणि समृद्धी वाढविण्यातच दिवाळीचे खरे अध्यात्मिक सार सामावले आहे. कारण दिवाळी ही केवळ दिव्यांची नव्हे तर आत्मजागृतीची आणि माणुसकीच्या प्रकाशाची पर्वणी होय.

–शशिकांत तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

बाबा, तुमच्या विचारांचा वारसा हाच आमचा आधार!



काळ पुढे सरकत आहे, दिवस बदलत आहेत, आयुष्याची वाटचाल अविरत सुरू आहे; पण बाबा, तुमच्या आठवणी मात्र आजही आमच्या मनात तितक्याच जिवंत, तितक्याच ताज्या आहेत. तुम्ही आज आपल्यातून निघून गेलात, या कटू सत्यावर मन आजही विश्वास ठेवायला तयार नाही. तुमच्या आठवणींच्या पावन सहवासातच आम्ही आजही आमचा प्रत्येक दिवस जगत आहोत.

तुमचा तो मायेचा स्पर्श, ते प्रेमळ शब्द, प्रसंगी दिलेला धीर आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुम्ही केलेले मार्गदर्शन आजही आमच्या मनाला एक वेगळे बळ देत आहे. आयुष्यात कितीही मोठे संकट आले, तरी आमच्या पाठीवर असणारा तुमचा विश्वासाचा हात आम्हाला पुन्हा नव्याने उभे राहण्याची ताकद द्यायचा. तुम्ही दिलेले संस्कार, तुमची शिकवण, तुमचे निस्वार्थ प्रेम आणि अनुभवांची समृद्ध शिदोरी हीच आज आमच्या आयुष्याची खरी पुंजी बनली आहे. बाबा, तुम्ही दिलेला विचारांचा वारसा आणि तुमचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवूनच आम्ही आमची पुढील वाटचाल करत आहोत. आमच्यासाठी तुम्ही केवळ वडील नव्हता, तर आमचे दैवत, आमचा अथांग आत्मविश्वास, आमची प्रेरणा आणि संपूर्ण आयुष्याचा भक्कम आधार होता.

आज आयुष्यात आनंदाचे क्षण असोत की संकटाचे कठीण प्रसंग, प्रत्येक वेळी तुमची उणीव प्रकर्षाने जाणवते. एखादा महत्त्वाचा निर्णय घेताना तुमचा तो मोलाचा सल्ला, अडचणीच्या वेळी मिळालेला धीर आणि आनंदाच्या क्षणी तुमच्या चेहऱ्यावरचे ते तृप्त समाधान पाहण्याची इच्छा आजही मनात दाटून येते. तुमची ही खंबीर साथ आणखी कितीतरी वर्षे आम्हाला लाभायला हवी होती, बाबा... तुमच्या सहवासात अजून खूप काही अनुभवायचे होते, मनातील कित्येक गोष्टी सांगायच्या होत्या आणि तुमच्याकडून अजून बरेच काही शिकायचे होते.

सांगतात की, माणूस या जगातून निघून जातो, पण त्याने दिलेले संस्कार, त्याचे प्रेम आणि त्याच्या आठवणी कधीच संपत नाहीत. तुम्ही आज आमच्यात प्रत्यक्ष रूपाने नसला, तरीही आमच्या प्रत्येक विचारात, प्रत्येक कृतीत आणि संस्कारात तुम्ही सदैव जिवंत आहात. तुमचे पावन आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी असेच राहोत, हीच ईश्वरचरणी नम्र प्रार्थना!

बाबा, तुमच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त तुमच्या या पवित्र स्मृतीस आमचे कृतज्ञतापूर्वक विनम्र नमन!

–संध्या संगेवार,
नांदेड

दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाची लोकचळवळ उभी करा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे आवाहन

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानासाठी समन्वयाने काम करण्याचे सीईओ महेश पाटील यांचे निर्देश

नांदेड (प्रतिनिधी)– दुष्काळ आणि पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारणाची विविध कामे लोकसहभागातून हाती घेऊन श्रमदानाची व्यापक लोकचळवळ उभी करावी. प्रशासनाने केवळ नियोजनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून गावांचा विकास साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाच्या वतीने अर्धापूर तालुक्यातील डौर येथील नंदीग्राम पर्यटन केंद्रात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.० कार्यशाळा आणि जिल्हास्तरीय दुष्काळ व पाणीटंचाई आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.



जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले, व्ही.बी.-जी रामजीच्या माध्यमातून माती नाला बांध, जलसंधारण आणि पाणलोट विकासाची कामे नियोजनबद्ध पद्धतीने राबवावीत. गावांमध्ये लोकसहभाग वाढवून श्रमदानाला प्रोत्साहन द्यावे. चांगले काम करणाऱ्या गावांमध्ये मी स्वतः, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी श्रमदानात सहभागी होणार असून, आठवड्यातून किमान दोन ठिकाणी भेट देण्याचा प्रयत्न राहील. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान केवळ शासकीय उपक्रम न ठेवता लोकचळवळ बनवावे. गावविकास, जलसंधारण, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक परिवर्तनासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. या कामांसाठी प्रशासन खंबीरपणे पाठीशी राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी अभियानातील गुणांकन निकषांनुसार कामांचे नियोजन करून सर्व विभागांनी एकजुटीने काम करण्याचे निर्देश दिले. ग्रामस्तरावरील प्रशासन अधिक सक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी विभागांमध्ये समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यालयाकडून प्राप्त सूचना तातडीने ग्रामस्तरापर्यंत पोहोचवाव्यात. दर सोमवारी विभागनिहाय आढावा घेऊन प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत. ग्रामसेवकांनी शासकीय अभिलेख अद्ययावत ठेवण्यासह घरकुल, पाणीपुरवठा, स्थानिक निधी, जल व मृदसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. बालविवाह प्रतिबंध आणि व्यसनमुक्तीसारख्या सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य द्यावे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम केल्यास नांदेड जिल्हा या अभियानात अव्वल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेत मधुकर मोरे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचे सादरीकरण केले. पाणीटंचाई, घनकचरा व्यवस्थापन आणि चारा टंचाई या विषयांवर अनुक्रमे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, मयूरकुमार आंदेलवाड आणि डॉ. प्रवीणकुमार घुले यांनी मार्गदर्शन केले. ग्रामसेवक संघटनेचे अमृत शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी. गिरी यांनी केले, तर आभार सहाय्यक गटविकास अधिकारी सुधीर पाटील यांनी मानले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, डी.बी. गिरी, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

नागरिकांच्या समस्यांवर तातडीने कारवाई करा; अपर जिल्हाधिकारी डॉ. गायकवाड यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



नांदेड (प्रतिनिधी)– नागरिकांच्या दैनंदिन समस्या आणि ग्राहकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी दिले.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत साळी, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, वैधमापनशास्त्र विभागाचे उपनियंत्रक अ. ध. गेहदे, महावितरणचे कार्यकारी अभियंता जी. के. गाडेकर, अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रतिनिधी तसेच अशासकीय सदस्य भागीरथी बच्चेवार, ॲड. दिपाली डोणगावकर, गंगाधर साधू, आनंद कृष्णापूरकर, बाळासाहेब पानसे, रमेश अहिरे, प्रशांत वैद्य, डॉ. सायन्ना मठमवार, बालाजी लांडगे, राजेश्वर लापशेटवार व रमाकांत घोणसीकर उपस्थित होते.

सदस्यांनी शहरातील साप्ताहिक बाजारांमुळे होणारी वाहतूक कोंडी, अतिक्रमणे, पार्किंग व्यवस्था, रस्त्यांची दुरुस्ती, सार्वजनिक स्वच्छतागृहे, कचरा संकलन व नालेसफाई, गोदावरी नदीचे प्रदूषण रोखणे आणि घाट स्वच्छतेचे प्रश्न उपस्थित केले. सिडको, हडको व तरोडा बुद्रुक परिसरातील अनियमित पाणीपुरवठा, जिल्ह्यातील घनकचरा व्यवस्थापन तसेच पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षतोड रोखून वृक्षारोपण करण्याची मागणी करण्यात आली.

वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी, अनधिकृत रिक्षांवर कारवाई, शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक, धार्मिक मिरवणुकांमुळे होणारी वाहतूक कोंडी आणि खासगी प्रवासी वाहनांकडून होणारी अवाजवी भाडेवाढ रोखण्याबाबत चर्चा झाली. तसेच ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण, पनीर व खवा यांमधील भेसळ आणि खाद्यतेलाच्या पुनर्वापरावर कारवाई, अनियमित वीजपुरवठ्यात सुधारणा, धोकादायक विद्युत खांब व तारांची दुरुस्ती या मागण्या करण्यात आल्या.

बँकांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र सुविधा, सेतू केंद्रांवरील अवाजवी शुल्क आकारणी रोखणे आणि जुन्या वाहनांच्या विल्हेवाटीबाबत जनजागृती करण्याचे मुद्देही मांडण्यात आले.

बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील साप्ताहिक बाजारासाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था, कौठा परिसरातील अनावश्यक गतिरोधक कमी करणे, महानगरपालिकेचे बंद मंगल कार्यालय सुरू करणे तसेच जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक दरमहा घेऊन तालुकास्तरावरही ग्राहक संरक्षण समित्या गठित करण्याच्या सूचना सदस्यांनी केल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. गायकवाड यांनी उपस्थित प्रश्नांवर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिबमध्ये 'दुसरा दिवा' कार्यक्रम संपन्न

नांदेड (प्रतिनिधी)– तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिबमध्ये पारंपारिक रीतिप्रमाणे दिपावली कार्यक्रमाचे शुभारंभ संत बाबा कुलवंत सिंघजी जत्थेदार साहिब यांच्या हस्ते करण्यात आले होते. याच अनुषंगाने गुरूवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी दिपावलीनिमित्त तख्त साहिब येथे दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे सचिव रविंद्रसिंघ बुंगई यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शंतनू डोईफोडे, चारुदत्त चौधरी तसेच गुरुद्वारा बोर्डाचे अधिक्षक रविंदरसिंघ कपूर, सहायक अधिक्षक जैमलसिंघ ढिल्लो, सहायक अधिक्षक बलविंदरसिंघ फौजी व अधिकारी व गणमान्य व्यक्तींच्या व साध संगतच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

कामठा येथे बालकावर तिघांनी केला अत्याचार अर्धापूर पोलिसांत गुन्हा दाखल

पोक्सो, माहिती तंत्रज्ञान अधिनियम यासह विविध गुन्हे दाखल

अर्धापूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील कामठा येथील अल्पवयीन मुलगा दुकानवर प्रोजेक्ट पेपर आणण्यासाठी जात असताना आरोपींनी अल्पवयीन मुलाला जबरदस्तीने अडवून पिडीत घरात नेऊन जबरदस्तीने अत्याचार केल्याचा अर्धापूर पोलीस ठाण्यात ३ विधीसंघर्षीत बालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेणारा बालक प्रोजेक्ट पेपर आणण्यासाठी दुकानावर जात होता. यावेळी आरोपींनी बालकाला रस्त्यावर अडवून घरात नेऊन शारीरिक अत्याचार केले व हाताने मारहाण केली. तसेच या घटनेचा व्हिडिओ चित्रीकरण करून ते इंस्टाग्रामवर व्हायरल करण्याची धमकी देऊन पैशाची मागणी केली. याप्रकरणी बालकाच्या फिर्यादीवरून ३ विधीसंघर्षीत बालकाविरुद्ध कलम १२७(२), १३७(२), ३०८(२), १११५(२), ३(५), ३५१(२) बीएनएस सहकलम-४, ८, १२ पोक्सो माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम-६७(ए),(बी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अमोल भगत हे करीत असल्याची माहिती ठाणे अंमलदार देविदास वाघमारे यांनी दिली आहे.

रुपेश धडेकर यांचे निधन

उमरी (प्रतिनिधी)– येथील रुपेश रामदास धडेकर (२७) यांचे गुरूवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता 'वैकुंठ स्मशानभूमी उमरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आले.



त्यांच्या पश्चात आई, वडील, बहीण, काका-काकू असा परिवार आहे. केंद्रीय प्राथमिक शाळा इज्जतगावचे मुख्याध्यापक रामदास इरवंतराव धडेकर यांचे ते पूत्र तर धर्माबादचे भारतीय बौध्द महासभा माजी तालुकाध्यक्ष तथा पत्रकार गंगाधर इरवंतराव धडेकर रा. धर्माबाद यांचे ते पुतणे होत.

सोनखेड पोलिसांची अवैध वाळू तस्करांवर कारवाई; ३ हायवा ट्रकसह १.२० कोटींचा मुद्देमाल जप्त, ५ जणांवर गुन्हे दाखल

नांदेड (प्रतिनिधी)– सोनखेड पोलिसांनी गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून चोरटी वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध धडक मोहीम राबविली आहे. दि. ३ आणि ५ नोव्हेंबर रोजी करण्यात आलेल्या तीन स्वतंत्र कारवायांमध्ये पोलिसांनी ३ हायवा ट्रक आणि १५ ब्रास वाळू असा एकूण १ कोटी २० लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ५ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.



दि. ३ नोव्हेंबर रोजी पहाटे सोनखेड ठाण्याचे प्रभारी अधिकारी भागवत नागरगोजे व त्यांचे पथक सोनखेड- कलंबरफाटा ते दापशेड रोडवर पेट्रोलिंग करत होते. दापशेड येथे समोरून येणारा हायवा ट्रक क्र. (एमएच २६ सीव्ही ४२८५) थांबवून चालकाकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव ओमकार प्रकाशराव भुजबळ, वय २१, रा. शेलगाव, ता. लोहा असे सांगितले. वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात ५ ब्रास वाळू आढळली. रॉयल्टीबाबत विचारणा केली असता कोणताही परवाना नसून सदर वाळू कल्लाळ येथील गोदावरी नदीपात्रातून चोरटी विक्रीसाठी भरून आणल्याचे त्याने सांगितले.

या कारवाईत ४० लाखांचा हायवा ट्रक व ३० हजार रुपयांची ५ ब्रास रेती असा एकूण ४० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी चालक ओमकार भुजबळ व हायवाचा अज्ञात मालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत त्याच दिवशी पहाटे सोनखेड ओव्हरब्रिज रोडवर पेट्रोलिंगदरम्यान हायवा ट्रक क्र. एमएच २६ सीटी १४५० थांबविण्यात आला. चालक कैलास उद्धव रेनके, वय २०, रा. बेनाळ, ता. लोहा याच्याकडे चौकशी केली असता वाहनात रेती असून तिचा कोणताही परवाना नसल्याचे त्याने सांगितले. सदर रेती कल्लाळ येथील गोदावरी नदीपात्रातून चोरटी विक्रीसाठी भरून आणल्याचे स्पष्ट झाले.

या कारवाईत ४० लाखांचा हायवा व ३० हजार रुपयांची ५ ब्रास रेती असा एकूण ४० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तिसऱ्या कारवाईत दि. ५ नोव्हेंबर रोजी पहाटे बेटसांगवी शिवारात पेट्रोलिंगदरम्यान ३३ के. व्ही. परिसरात पिंपळगाव (निमजी) कडून बेटसांगवीकडे जाणारा वाळूने भरलेला हायवा ट्रक क्र. एमएच २० ईजी ६४४४ पोलिसांनी थांबविला. चालक मारोती नागोराव कदम, वय २४, रा. सावरगाव नसरत, ता. लोहा याने गाडी मालक चांदू व्यंकटी डक, रा. पिंपळगाव निमजी असल्याचे सांगितले. मालकाच्या सांगण्यावरून पिंपळगाव (निमजी) शिवारातील गोदावरी नदीपात्रातून विनापरवाना व पावतीशिवाय रेती चोरून नेत असल्याचे त्याने सांगितले.

या कारवाईत ४० लाखांचा हायवा व २५ हजार रुपयांची ५ ब्रास रेती असा एकूण ४० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिन्ही प्रकरणात पोलीस ठाणे सोनखेड येथे कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता तसेच कलम ४८(७) व ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आयुर्वेदिक महाविद्यालय, रुग्णालय व रसशाळेच्या कामकाजाचा आ. आनंदराव बोंढारकर यांनी घेतला आढावा

रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासह विकासकामांना गती देण्यावर भर

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, रुग्णालय आणि रसशाळेला आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी संस्थेतील विविध विभागांच्या कामकाजाची माहिती घेतली तसेच सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला.



यावेळी आयोजित बैठकीत आगामी काळातील नियोजन, आवश्यक सोयी- सुविधा आणि संस्थेच्या विकासासंदर्भातील विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्वसामान्य रुग्णांना रुग्णालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांची माहिती घेत आमदार बोंढारकर यांनी स्वतःची डोळ्यांची तपासणी व रक्ततपासणी करून घेत या सुविधांचा अनुभवही घेतला.

संस्थेच्या कामकाजात अधिक सुधारणा व्हावी, रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी तसेच महाविद्यालयाच्या विकासाला गती मिळावी, यासाठी आवश्यक उपाययोजनांवर त्यांनी यावेळी चर्चा केली.

याप्रसंगी संस्थेचे अधिष्ठाता डॉ. गंगासागरे यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नांदेड शहरात अतिक्रमण व अवैध पार्किंगविरोधात पोलीस-मनपाची धडक मोहीम; ७८ वाहनांवर ६९,३०० रूपयांचा दंड -पोनि वागतकर



नांदेड (प्रतिनिधी)– शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाढते अतिक्रमण आणि अवैध पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी शहर वाहतूक शाखेने विशेष मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक आनंद वागतकर (इतवारा) आणि महानगरपालिका, नांदेड यांच्या नेतृत्वाखाली कविता हॉटेल, बाफना टी पॉईंट, बरकत कॉम्प्लेक्स, देगलूर नाका या प्रमुख मार्गांवर संयुक्त कारवाई करण्यात आली. या मोहिमेत शहर वाहतूक शाखेचे अंमलदार, आरसीपी पथक तसेच मनपाचे पथक सहभागी झाले होते.

कारवाई दरम्यान रस्त्यालगत करण्यात आलेली अतिक्रमणे हटविण्यात आली. हातगाड्या, फळविक्रेते, टपऱ्या व वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे इतर अडथळे दूर करण्यात आले. याशिवाय चुकीच्या पद्धतीने वाहन पार्किंग करणाऱ्या व रहदारीस अडथळा करणाऱ्या ७८ वाहनचालकांवर कारवाई करून ६९ हजार ३०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

सर्व नागरिकांनी सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमण करू नये, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी वाहने उभी करू नयेत. तसेच पालकांनी आपल्या अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, ट्रिपल सीट प्रवास करू नये आणि सर्व वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

ही विशेष मोहीम यापुढेही नियमित सुरू राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे, असा इशारा वाहतूक शाखेने दिला आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी बचत व तातडीच्या उपाययोजनांसाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत तातडीची आढावा बैठक संपन्न

नांदेड (प्रतिनिधी)– जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या 'अल- निनो'च्या प्रभावामुळे यंदा संपूर्ण महाराष्ट्रासह नांदेड जिल्ह्यातही सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाला आहे. या तीव्र दुष्काळी परिस्थितीमुळे उपलब्ध असलेला मर्यादित जलसाठा अत्यंत काटकसरीने वापरून पुढील ऑगस्ट २०२७ पर्यंत संपूर्ण नांदेड शहराला अखंडित पाणीपुरवठा करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे. पाण्याचे हेच गंभीर संकट ओळखून दिनांक ४ नोव्हेंबर रोजी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता संतोष मुळे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात एक अत्यंत महत्त्वपूर्ण व तातडीची आढावा बैठक पार पडली.



या बैठकीला मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दिपकसिंह रावत, महिला बाल कल्याण सभापती सौ.सदिच्छा सोनी पाटील, उपसभापती निरंजना लांडगे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, माजी महापौर तथा नगरसेवक जयश्री पावडे, नगरसेवक किशोर स्वामी, नगरसेवक संजय घोगरे पाटील, दिलीप कंदकुर्ते, अमित तेहरा, माजी नगरसेवक उमेश पवळे, शहर अभियंता सुमंत पाटील, उपअभियंता प्रकाश कांबळे, उपअभियंता नरेंद्र सुजलेगांवकर, उपअभियंता सतीश ढवळे व सर्व कनिष्ठ अभियंता उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी शहर अभियंता यांनी पाणी पुरवठा विभागाने गेल्या महिनाभरात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर केला. पाणी पुरवठा विभागाने मागील महिन्याभरात शहरातील अवैध पाणी वापर रोखण्यासाठी १०९ अनधिकृत नळ जोडण्या खंडित केल्या आहेत. त्याचप्रमाणे पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी तातडीने २३१ ठिकाणी गळती दुरुस्ती करण्यात आली असुन सार्वजनिक व इतर ठिकाणी पाण्याचा अपव्यय थांबवण्यासाठी ८० नवीन तोट्या बसविण्यात आल्या असुन १२१ अस्वामित्व नळजोडण्या खंडीत करण्यात आल्या असल्याची माहिती पाणी पुरवठा विभागा मार्फत देण्यात आली. त्याचप्रमाणे डंकीन येथील मलशुध्दीकरण केंद्रातुन २ एमएलडी सांडपाणी पुनर्वापर करुन शहरात विविध ठिकाणी पावसाचे पाणी साठवण्यासाठी २१ रिचार्ज पिट तयार करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

त्याचप्रमाणे शहरात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर बागकाम, बांधकाम आणि इतर अ-घरगुती कामांसाठी कसा करता येईल, यावर तातडीने कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश महापौरांनी दिले आहेत.

जिल्ह्यात फसवणुकीच्या दोन घटना उघड; बँक कर्मचाऱ्याने ४.३६ लाख हडपले, तर व्यापाऱ्याला १.३८ लाखांचा गंडा

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात फसवणुकीच्या दोन वेगवेगळ्या घटना उघडकीस आल्या आहेत. इस्लापूर येथे बँक कर्मचाऱ्याने कर्जदारांकडून वसूल केलेली ४ लाख ३६ हजार रुपयांची रक्कम हडप केल्याचा, तर बिलोली येथे हार्डवेअर व्यापाऱ्याला माल पाठविण्याचे आमिष दाखवून १ लाख ३८ हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. दोन्ही प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

इस्लापूर ठाण्याच्या हद्दीत बँक कर्मचाऱ्याकडूनच फसवणुकीचा प्रकार घडला आहे. दि. ३१ जानेवारी २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत भारत फायनान्स लिमिटेड, इस्लापूर शाखा येथे आरोपी वैभव व्यंकट पांचाळ, रा. भोकर याने २६ कर्जदारांकडून पावती न देता वसूल केलेली एकूण ४ लाख ३६ हजार २०४ रुपये रक्कम बँक कार्यालयात जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी जवळ ठेवून बँकेच्या कर्जदार व सदस्यांची फसवणूक केली.

याप्रकरणी भारत फायनान्स लिमिटेड, हदगाव येथे नोकरीस असलेले फिर्यादी उमेश देवराव बळकोणे, वय ४४ वर्षे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे इस्लापूर येथे गु.र.नं. १४८/२०२६ कलम ३१८(४), ३१६(४) बीएनएस २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास मपोउपनि कागणे करीत आहेत. तर दुसऱ्या घटनेत बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत ऑनलाईन गंडा घातल्याची घटना पुढे आली आहे. दि. १२ सप्टेंबर २०२६ ते १ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान सगरोळी येथील फिर्यादीच्या हार्डवेअर दुकानात दोन अज्ञात मोबाईलधारकांनी संगनमत करून फिर्यादीस हार्डवेअरचा माल पाठविण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर फिर्यादीकडून RTGS व फोन पेद्वारे एकूण १ लाख ३८ हजार ५०० रुपये घेऊन माल न पाठविता फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी प्रवीण मारुती बागे, वय ४२ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. सगरोळी, ता. बिलोली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे बिलोली येथे गु.र.नं. २४७/२०२६ कलम ३१८(४), ३(५) बीएनएस २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास मसपोनि जाधव करीत आहेत.

लातुरात मटका बुकींवर डीआयजी पथकाचा छापा; १३ जणांविरुद्ध कारवाई, १ लाखाचा मुद्देमाल जप्त



नांदेड/लातूर(प्रतिनिधी)– लातूर जिल्ह्यात अवैध व्यवसाय सुरू असल्याबाबतच्या तक्रारी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्राप्त झाल्या होत्या. त्यावरून त्यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक विशेष पथक लातूर जिल्ह्यात रवाना केले होते. या पथकाने दि. ४ नोव्हेंबर रोजी लातूरमध्ये दोन ठिकाणी धडक कारवाई केली.

गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील मार्केट यार्ड गेट नंबर ४ समोर, प्रिया टी हाऊसच्या बाजूला असलेल्या शटरमध्ये सुरू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करण्यात आली. यावेळी ९ हजार २८० रुपयांची रोकड व ४६ हजार रुपये किमतीचे ६ मोबाईल असा एकूण ५५ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात एकूण ८ जणांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याविरुद्ध गांधी चौक पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७६९/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दुसरी कारवाई–विवेकानंद चौक

विवेकानंद चौक पोलीस ठाणे हद्दीतील बनसोडे नगर येथे मोकळ्या जागेत मटका खेळवित व खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या ठिकाणाहून १४ हजार ९५० रुपयांची रोकड व ३० हजार रुपये किमतीचे ३ मोबाईल असा एकूण ४४ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात एकूण ५ जणांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याविरुद्ध विवेकानंद चौक पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७९०/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दोन्ही कारवायांमध्ये पथकाने एकूण १३ जणांकडून २४ हजार २३० रुपयांची रोकड व ९ मोबाईल असा एकूण १ लाख २३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह हवालदार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे व गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती या हेल्पलाईनवरून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन डीआयजी शहाजी उमाप यांनी केले आहे.

श्री सुभाष शुगर व शिऊर साखर कारखान्याकडून प्रतिटन ३२०१ रुपयांप्रमाणे पहिले ऊस बील जमा



हदगाव (प्रतिनिधी)– ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर श्री सुभाष शुगर प्रा. लि. व शिखर साखर कारखान्याने गाळप झालेल्या उसाचे पहिले पंधरवड्याचे बील प्रतिमेट्रिक टन ३ हजार २०१ रुपये याप्रमाणे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले आहे. कारखाना व्यवस्थापनाने घेतलेल्या या निर्णयामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसाठी अधिक गोड होणार आहे.

दिवाळी हा सण प्रत्येक कुटुंबासाठी आनंदाचा आणि उत्साहाचा असतो. मात्र, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसाठी आर्थिक नियोजनाला विशेष महत्त्व असते. सणासुदीच्या काळात घरगुती गरजा, मुलांचे शिक्षण, शेतीसाठी लागणारा खर्च तसेच इतर आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडताना शेतकऱ्यांना पैशांची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत कारखान्याने पहिल्या पंधरवड्याचे ऊस बील वेळेत जमा केल्याने शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य मोबदला देणे, त्यांचा आर्थिक विश्वास कायम राखणे आणि कारखाना व शेतकरी यांच्यातील सहकार्याचे नाते अधिक दृढ करणे या उद्देशाने श्री सुभाष शुगर व शिखर साखर कारखान्याने ऊस बिलाची रक्कम लवकरात लवकर अदा करण्याचे धोरण स्वीकारले आहे. विशेषतः दुष्काळी परिस्थिती आणि शेतीसमोरील आर्थिक आव्हाने लक्षात घेता, दिवाळीच्या तोंडावर जमा झालेल्या या रकमेमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे.

कारखान्याला सातत्याने ऊस पुरवठा करून सहकार्य करणाऱ्या शेतकऱ्यांनी यापुढेही जास्तीत जास्त ऊस पुरवठा करावा. तसेच इतर कारखान्यांकडे ऊस देण्याची घाई करू नये, असे आवाहन शेतकरी बांधवांना करण्यात आले आहे.

दिवाळीनिमित्त नांदेड-हडपसर दरम्यान विशेष रेल्वेगाडी

नांदेड (प्रतिनिधी)– दिवाळी- निमित होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे नांदेड-हडपसर-नांदेड दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गाडी क्र. ०७६०७ नांदेड-हडपसर : ही गाडी शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड येथून सकाळी ६:५० वाजता सुटून पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, हरंगुळ, औसा रोड, मुरुड, ढोकी, येडशी, धाराशिव, पांगरी, बार्शी, शेंद्री, कुर्डूवाडी, केम, जेऊर, कित्तूर, भिगवण आणि दौंड मार्गे त्याच दिवशी रात्री २२:५ वाजता हडपसर येथे पोहोचेल. (१ फेरी). गाडी क्र. ०७६०८ हडपसर-नांदेड : ही गाडी शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी हडपसर येथून रात्री २३:४० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता नांदेड येथे पोहोचेल.

Change In Name

MY OLD NAME IS IRAM FATEMA. NOW I AM CHANGING AS A NEW NAME IRAM BEGUM SHAIKH FARUKH.HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE KINDLY CONSIDER THE SAME. FULL ADDRESS. R.M.MANZIL SAYMA PARK NEAR ADNAN GARDEN KAMAN DHANEGAON TQ DIST NANDED MS 431603. MOB.NO.7770033888

कागदपत्र हरवले

माझी **पल्लवी भीमराव बहादुरे** या नावाची दहावी पासचे मार्कमेमो व बारावी पासचे सदन नांदेड ते छ.संभाजीनगर प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

– संपर्क पत्ता –
पल्लवी भीमराव बहादुरे
रा. नवीन मोंढा नांदेड
मो.नं. ९३२५८३७४८४

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रशीद पावती हरवली

माझी न्यु गोविंद वेअर हाऊस एम.आय.डी.सी. खानापूर ता. देगलूर जि.नांदेड या नावाची पांढरी तूर असलेल्या भास्कर दादाराव शिंदे या नावाची रशीद पावती क्रमांक ३३६७ देगलूर ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा.

– संपर्क पत्ता –
न्यु गोविंद वेअर हाऊस खानापूर
ता देगलूर जि नांदेड
मो. ९७६६२०५५५६, ९९७०१४६६२४

ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

उप्तत सॅचखंड स्री हजुर अबिचलठगर साहिब, नांदेड- ४३१ ६०१ (महाराष्ट्रा)-भारत

Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India

Ph.No. 02462-234813, 241266, 243559
E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com

No. 1769/2621 Date 05/11/26

गुरुद्वारा बोर्ड तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहिब, नांदेड हळद व सोयाबिन विक्रीचे जाहिर प्रगटन

सर्व हळद व सोयाबिन खरेदीदार व्यापारी, एजंट, ऑईल मिल कंपनीयांना सुचित करयात येते कि, गुरुद्वारा सचखंड साहिब, नांदेड यांच्या मालकीची हळद 16 क्विंटल व सोयाबिन अंदाजे 100 क्विंटल विक्री करणे आहे.

तरी संबंधीत खरेदीदारांनी खरेदी दराची सिलबंद निविदा दि.12/11/26 पर्यंत अधिक्षक गुरुद्वारा सचखंड साहिब, नांदेड या नावाने कार्यालयीन वेळेत गुरुद्वारा सचखंड साहिबच्या कार्यालयात आणून द्यावी किंवा पोहचेल या बेताने पाठवावी. शक्य झाल्यास त्याच दिवशी सकाळी 11-00 वाजता निविदा उघडण्यात येईल.

हळद व सोयाबिन विक्री बाबतचे सर्व अधिकार अधिक्षक-गुरुद्वारा सचखंड साहिब, नांदेड यांना राहतील.

नोट :- हळद व सोयाबिन मालाचा नमुना गुरुद्वारा बोर्डाच्या श्री गुरु ग्रंथ साहिब जी भवन येथे पहावयास मिळेल.

प्र. अधिक्षक,
गुरुद्वारा सचखंड बोर्ड,नांदेड

कार्यालय नगरपरिषद,-किनवट जि.नांदेड

नविन, प्रशासकीय इमारत, नागरी दवाखान्याच्या बाजुस, किनवट ता. किनवट जि. नांदेड
टोल फ्री क्र.18002332211 Email : cokinwat@gmail.com

जा. क्र. पाणु निविदा सु. 288/2026 दिनांक :- / /2026

निविदा सुचना

किनवट नगरपरिषद मार्फत सन 2026-27 करिता किनवट नगर परिषद पाणी पुरवठा विभागाकरिता खालील कामासाठी संबंधीत संस्था, एजंसी नोंदणीकृत, कंत्राटदार यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी, सदर कामाकरीता निविदा फॉर्म प्राप्त करणे व भरणेसाठी दि. 8/11/2026 ते दि.17/11/2026 दुपारी 4.00 वाजे पर्यंत सुटीचे दिवस वगळून उपलब्ध करण्यात येईल.

अ.क्र.	कामाचे तपशिल	अनामत रक्कम	कोरी निविदा फॉर्म रक्कम
1	किनवट नगर परिषद पाणी पुरवठा करिता ब्लिचिंग पावडर व तुरटी पुरवठा करणे बाबत.	2000	500

अटी व शर्ती

1. निविदा द्वीलीफाफा पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.
2. लीफाफा क्र. 1 कागदपत्रे व लीफाफा क्र. 2 दरत्रक सादर करावे.
3. निविदा संबधीत माहिती न.प.कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.
4. निविदा प्रक्रिया रद्द करणे, निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवला आहे.

मुख्याधिकारी,
नगर परिषद किनवट

जाहीर प्रगटन

संचिका क्रं. NT/01/15490/क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी
प्रकरण:- नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते **श्री/सौ कमरुनिस्सा अखिल पठाण** रा. सांगवी बु. नांदेड या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 सांगवी बु. गट नं. 175 पैकी प्लॉट क्रं. 70 पिन क्र. 40103072283 **श्री/सौ. शेख शब्बरी शेख बशीर** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्रं. 2833 दि.04.09.2026** च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्र क प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :-

पुर्व :- 20 फुट रुंद रोड आहे.
पश्चिम :- प्लॉट क्रं. 61 आहे.
दक्षीण :- प्लॉट क्रं. 69 आहे.
उत्तर :- प्लॉट क्रं. 31 आहे.

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानरलिका,नांदेड

जाहिर प्रगटन

माझी पक्षकार **शादाब कलीम अहेमद रा. हिलाल नगर देगलुर नाका नांदेड** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन खालील प्रमाणे जाहिर प्रगटण देण्यात येते की,

हे की माझे पक्षकार यांनी **रुबीना बेगम मोहम्मद युनुस रा. मिल्लतनगर देगलुर नाका नांदेड** यांच्या ताब्यातील सौदाचिट्ठी आधारे खरेदी घेतलेले नांदेड वाघाळा शहर हदीतील मौजे ब्रम्हपूरी यथील सर्वे नं 38/2 पैकी ममतानगर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या ब्रम्हपुरी नांदेड येथील प्लॉट नं 147 असुन ज्याची रुंदी पुर्व-पश्चिम 30 फुट आहे व लांबी दक्षिण-उत्तर 40 फुट आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ 1200 चौरस फुट म्हणजे 111.52 चौरस मिटर आहे.**ज्याची चतु:सिमा** पुर्वेस - प्लॉट नं 146 पश्चिमेस - प्लॉट नं 148 दक्षिणेस - 25 फुट रुंद रस्ता आहे. उत्तरेस - नाला आहे. असे नमुद चतु:सिमच्या आतील प्लॉट माझे पक्षकार यांनी **रुबीना बेगम मोहम्मद युनुस यांच्याकडुन** खरेदी करण्याचा करार करुन बयाना रक्कम दिली आहे. व उर्वरीत रक्कम **रुबीना बेगम मोहम्मद युनुस** यांना देऊन संस्थेमार्फत आपल्या हक्कात रजिस्ट्री व ताबा करुन घेणार आहे.

तरी सर्व जनतेस व हितसंबधीताना या प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की ,नमुद प्लॉट बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप, उजर , हितसंबध वगैरे असल्यास सदर प्लॉट बाबत यापुर्वी कोणतेही लेखी व्यवहार झालेले असल्यास अथवा सदर जमीनीवर कोणतेही कर्ज बोजो घेतलेले किंवा नमुद प्लॉट बाबत कोणतेही न्यायलयीन / कार्यालयीन प्रकरण प्रलंबीत असल्यास अथवा जाहिर प्रगटन देणार यांचे विरुध्द कोणतेही आदेश पारीत झालेले असल्यास , सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या 07 दिवसाचे आत आपले लेखी कागदपत्रासह खालील दिलेल्या पत्यावर आपले लेखी आक्षेप नोंदवावेत. मुदतीत कोणतेही आक्षेप उजर न आल्यास माझे पक्षकार हे नमुद प्लॉटचे रजिस्ट्री करुन ताबा आपले हक्कात करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप ,उजर ग्राहय धरले जाणार नाहीत .कृपया याची नोंद घ्यावी .करीता सबब जाहिर प्रगटन .

मार्फत
ॲड.गुलाम अहेमदोद्दीन जागीरदार
ॲड अय्युबोद्दीन जागीरदार
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
मो.नं. 9665372113 , 9823316144

जाहिर प्रगटण देणार
शादाब कलीम अहेमद रा. हिलाल नगर देगलुर नाका नांदेड
मो.नं. 9021085619

जाहिर प्रगटन

माझी पक्षकार **मोहम्मद दिलशाद कलीम रा. हिलाल नगर देगलुर नाका नांदेड** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन खालील प्रमाणे जाहिर प्रगटण देण्यात येते की,

हे की माझे पक्षकार यांनी **अदनान आशिर मोहम्मद इस्माईल रा. मिल्लतनगर देगलुर नाका नांदेड** यांच्या ताब्यातील सौदाचिट्ठी आधारे खरेदी घेतलेले नांदेड वाघाळा शहर हदीतील मौजे ब्रम्हपूरी यथील सर्वे नं 38/2 पैकी ममतानगर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या ब्रम्हपुरी नांदेड येथील प्लॉट नं 148 असुन ज्याची रुंदी पुर्व-पश्चिम 30 फुट आहे व लांबी दक्षिण-उत्तर 40 फुट आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ 1200 चौरस फुट म्हणजे 111.52 चौरस मिटर आहे.**ज्याची चतु:सिमा** पुर्वेस - प्लॉट नं 1147 पश्चिमेस - प्लॉट नं 149 दक्षिणेस - 25 फुट रुंद रस्ता आहे. उत्तरेस - नाला आहे. असे नमुद चतु:सिमच्या आतील प्लॉट. माझे पक्षकार यांनी **अदनान आशिर मोहम्मद इस्माईल यांच्याकडुन** खरेदी करण्याचा करार करुन बयाना रक्कम दिली आहे. व उर्वरीत रक्कम **अदनान आशिर मोहम्मद इस्माईल** यांना देऊन संस्थेमार्फत आपल्या हक्कात रजिस्ट्री व ताबा करुन घेणार आहे.

तरी सर्व जनतेस व हितसंबधीताना या प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की ,नमुद प्लॉट बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप, उजर , हितसंबध वगैरे असल्यास सदर प्लॉट बाबत यापुर्वी कोणतेही लेखी व्यवहार झालेले असल्यास अथवा सदर जमीनीवर कोणतेही कर्ज बोजो घेतलेले नमुद प्लॉट बाबत कोणतेही न्यायलयीन / कार्यालयीन प्रकरण प्रलंबीत असल्यास अथवा जाहिर प्रगटन देणार यांचे विरुध्द कोणतेही आदेश पारीत झालेले असल्यास , सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या 07 दिवसाचे आत आपले लेखी कागदपत्रासह खालील दिलेल्या पत्यावर आपले लेखी आक्षेप नोंदवावेत. मुदतीत कोणतेही आक्षेप उजर न आल्यास माझे पक्षकार हे नमुद प्लॉटचे रजिस्ट्री करुन ताबा आपले हक्कात करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप ,उजर ग्राहय धरले जाणार नाहीत .कृपया याची नोंद घ्यावी .करीता सबब जाहिर प्रगटन .

मार्फत
ॲड.गुलाम अहेमदोद्दीन जागीरदार
ॲड अय्युबोद्दीन जागीरदार
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
मो.नं. 9665372113 , 9823316144

जाहिर प्रगटण देणार
मोहम्मद दिलशाद कलीम रा. हिलाल नगर देगलुर नाका नांदेड
मो.नं. 9021085619

जाहिर प्रगटन

मा. आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नांदेड, यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज १५१५/२०२६
दिगांबर व ईतर वि. निरंक
ने.ता. ०१/१२/२०२६.

अर्जदार:-
१. दिगांबर पि. दत्ता कदम , वय : ३८ वर्षे, धंदा : शेती ,
२. शुभम पि. ज्ञानेश्वर कदम , वय : २१ वर्षे, धंदा - शेती ,
३. रोहीत पि. ज्ञानेश्वर कदम , वय : १८ वर्षे, धंदा - शेती ,

सर्व रा. तुप्पा ता. जि. नांदेड मोबाईल क्र. 7447714144

विरुध्द

गैरअर्जदार: निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत...

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत पंडीत दिगांबर कदम यांचा मृत्यु दिनांक १४/०९/२०१५ रोजी तरोडा खु., नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ते ३ हा मयताचा भाउ रामकिशन यांचे नातु आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ३ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ०१/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जबाबदारी आपणा वर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

क.लिपिक
सह दिवाणी न्यायालय,क.स्तर, नांदेड

आदेशावरुन
सह्ना.अधिक्षक,
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

जाहिर प्रगटन

माझी पक्षकार **जेबा कलीम पि. पिर पाशा कलीम रा. हिलाल नगर देगलुर नाका नांदेड** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन खालील प्रमाणे जाहिर प्रगटण देण्यात येते की,

हे की माझे पक्षकार यांनी **समिना बेगम मोहम्मद युसूफ रा. रहेमतनग देगलुर नाका नांदेड** यांच्या ताब्यातील सौदाचिट्ठी आधारे खरेदी घेतलेले नांदेड वाघाळा शहर हदीतील मौजे ब्रम्हपूरी यथील सर्वे नं 38/2 पैकी ममतानगर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या ब्रम्हपुरी नांदेड येथील प्लॉट नं 146 असुन ज्याची रुंदी पुर्व-पश्चिम 30 फुट आहे व लांबी दक्षिण-उत्तर 40 फुट आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ 1200 चौरस फुट म्हणजे 111.52 चौरस मिटर आहे.**ज्याची चतु:सिमा** पुर्वेस - प्लॉट नं 145 पश्चिमेस - प्लॉट नं 147 दक्षिणेस - 25 फुट रुंद रस्ता आहे. उत्तरेस - नाला आहे. असे नमुद चतु:सिमच्या आतील प्लॉट माझे पक्षकार यांनी **समिना बेगम मोहम्मद युसूफ** यांच्याकडुन खरेदी करण्याचा करार करुन बयाना रक्कम दिली आहे. व उर्वरीत रक्कम **समिना बेगम मोहम्मद युसूफ** यांना देऊन संस्थेमार्फत आपल्या हक्कात रजिस्ट्री व ताबा करुन घेणार आहे.

तरी सर्व जनतेस व हितसंबधीताना या प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की ,नमुद प्लॉट बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप, उजर , हितसंबध वगैरे असल्यास सदर प्लॉट बाबत यापुर्वी कोणतेही लेखी व्यवहार झालेले असल्यास अथवा सदर जमीनीवर कोणतेही कर्ज बोजो घेतलेले असल्यास किंवा नमुद प्लॉट बाबत कोणतेही न्यायलयीन / कार्यालयीन प्रकरण प्रलंबीत असल्यास अथवा जाहिर प्रगटन देणार यांचे विरुध्द कोणतेही आदेश पारीत झालेले असल्यास , सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या 07 दिवसाचे आत आपले लेखी कागदपत्रासह खालील दिलेल्या पत्यावर आपले लेखी आक्षेप नोंदवावेत. मुदतीत कोणतेही आक्षेप उजर न आल्यास माझे पक्षकार हे नमुद प्लॉटचे रजिस्ट्री करुन ताबा आपले हक्कात करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप ,उजर ग्राहय धरले जाणार नाहीत .कृपया याची नोंद घ्यावी .करीता सबब जाहिर प्रगटन .

मार्फत
ॲड.गुलाम अहेमदोद्दीन जागीरदार
ॲड अय्युबोद्दीन जागीरदार
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
मो.नं. 9665372113 , 9823316144

जाहिर प्रगटण देणार
जेबा कलीम पि. पिर पाशा कलीम
रा. हिला नगर देगलुर नाका नांदेड
मो.नं. 9021085619

आरोग्य सेवेत हलगर्जीपणा केल्यास कठोर कारवाई -डॉ. विजय कंदेवाड

बायोमेट्रिक हजेरी, औषधसाठा व रुग्णसेवेतील त्रुटी दूर करण्याचे सक्त निर्देश



नांदेड (प्रतिनिधी)– सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णसेवेचा दर्जा उंचावून नागरिकांना वेळेत दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. आरोग्य सेवेत हलगर्जीपणा, अनियमितता अथवा कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, असे सक्त निर्देश आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी दिले.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या १ नोव्हेंबर रोजी झालेल्या 'आरोग्य संवाद यात्रा' दौऱ्यादरम्यान दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने ३ नोव्हेंबर रोजी डॉ. कंदेवाड यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड येथे आरोग्य विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. आरोग्य संवाद यात्रेदरम्यान काही ठिकाणी कामकाजात आढळलेल्या त्रुटी व अनियमिततांची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करावी, दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करावी आणि आवश्यकतेनुसार बदलीचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यातील प्रत्येक अधिकाऱ्याची कामानुसार जबाबदारी निश्चित करून कामकाजाचे नियमित मूल्यमापन करण्यावरही त्यांनी भर दिला.

सर्व आरोग्य संस्थांमध्ये २४ तास अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध ठेवाव्यात. रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगू नये. जीवनावश्यक व जीवनरक्षक औषधांचा पुरेसा साठा, १०२ व १०८ रुग्णवाहिका सेवा, प्रयोगशाळा तपासण्या आणि एक्स-रे सुविधा नियमित उपलब्ध ठेवाव्यात. वैद्यकीय उपकरणे कार्यान्वित ठेवून त्यांची नियमित देखभाल करावी. रुग्णालयातील स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, रुग्णांना दिला जाणारा आहार आणि कंत्राटी सेवांचा दर्जा उत्तम राखण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सौजन्यपूर्ण व संवेदनशीलतेने वागावे, असेही स्पष्ट केले.

सर्व नियमित व कंत्राटी अधिकारी-कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक पोर्टलवरील नोंदणी ४ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी. फेस रीडिंग व बायोमेट्रिक प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असून, उपस्थितीच्या आधारेच वेतन अदा करावे. यामध्ये अनियमितता आढळल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करण्यात येईल. वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्य करून रुग्णसेवा द्यावी. तसेच वैद्यकीय अधिकारी, विशेषज्ञ व इतर कर्मचाऱ्यांच्या सेवांचे योग्य नियोजन करून त्यांच्या कामकाजाचे नियमित मूल्यमापन करावे, असे निर्देश देण्यात आले.

महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेंतर्गत पात्र रुग्णांची नोंदणी वाढवावी. रुग्णकल्याण समितीचा निधी नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने वापरावा. जन्म नोंदणी २१ दिवसांच्या आत पूर्ण करून प्रमाणपत्र वितरित करावे. जनआरोग्य समिती व रुग्णालयीन समित्यांच्या बैठका नियमित घेऊन त्यातील निर्णयांची अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व वरिष्ठ जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी महिन्यातून किमान पाच आरोग्य संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन रुग्णसेवा, प्रशासकीय कामकाज व उपलब्ध सुविधांचा आढावा घ्यावा. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनीही प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना नियमित भेटी देऊन कामकाजाचे पर्यवेक्षण करावे. बैठकीतील सर्व निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करून अनुपालन अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

आरोग्य सेवा, कर्मचारी उपस्थिती, औषधसाठा, वैद्यकीय सुविधा आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा किंवा अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांसह पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांवरही कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा डॉ. कंदेवाड यांनी दिला. नागरिकांना दर्जेदार, तत्पर, पारदर्शक व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हेच आरोग्य विभागाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण टेक्निकल कॅम्पसमधील विद्यार्थ्यांची प्रदूषणमुक्त दीपोत्सवाची सामूहिक शपथ

४००० विद्यार्थ्यांचा दिवाळीत आतिषबाजीला नकार; पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार!



नांदेड (प्रतिनिधी)– दीपोत्सव म्हणजे प्रकाशाचा, मांगल्याचा आणि आनंदाचा उत्सव! मात्र, क्षणिक मनोरंजनासाठी फटाके फोडून पर्यावरणाचा ऱ्हास, निष्पाप जीवांचे आरोग्य धोक्यात आणि निसर्गाच्या संतुलनाला बाधा पोहोचविणाऱ्या आतिषबाजीला नकार देत ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी येथील विद्यार्थ्यांनी प्रदूषणमुक्त दीपोत्सव साजरा करण्याची सामूहिक शपथ घेतली. विशेष म्हणजे, केवळ स्वतः फटाके न फोडण्यापुरता हा संकल्प मर्यादित न ठेवता, किमान दोन मित्र, नातेवाईक अथवा परिचित व्यक्तींना फटाके फोडण्यापासून परावृत्त करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा निर्धारही विद्यार्थ्यांनी केला आहे. तसेच फटाक्यांवर अपव्यय होणारी रक्कम गरजू व्यक्तींच्या शिक्षण, आरोग्य, आणि समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्यात यावी असे आवाहन देखील याप्रसंगी करण्यात आले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीव, सामाजिक उत्तरदायित्व आणि नागरिक म्हणून कर्तव्यभावना रुजविण्यासाठी विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या अभियानांतर्गत सुमारे चार हजार विद्यार्थ्यांना प्रदूषणमुक्त दीपोत्सवाचे महत्त्व पटवून देणाऱ्या विशेष माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शपथपत्राद्वारे फटाके न फोडण्याचा, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी समाजाचे प्रबोधन करण्याचा आणि पर्यावरणपुरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प व्यक्त केला.

फटाक्यांवर दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी होते, वातावरणात विषारी वायू आणि सूक्ष्म धुलीकणांचे प्रमाण वाढते. याचा परिणाम श्वसनसंस्था, हृदय आणि फुप्फुसांच्या आरोग्यावर होतो. कर्णकर्कश आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच पशुपक्ष्यांना असह्य त्रास सहन करावा लागतो. फटाक्यांच्या निष्काळजी वापरातून भाजणे, डोळ्यांना इजा होणे, गंभीर अपघात आणि वित्तहानी होण्याच्या घटनाही घडतात. या घटना १० ते २० वर्षे वयोगटातील तरुणांचे प्रमाण सर्वाधिक असते. याशिवाय फटाके निर्मिती उद्योगातील ४५००० पेक्षा अधिक बालमजुरांचा प्रश्नही सामाजिक संवेदनशीलतेने विचार करण्यासारखा आहे. त्यामुळे काही क्षणांच्या आतिषबाजीसाठी दीर्घकाळाचे पर्यावरणीय आणि सामाजिक नुकसान का स्वीकारायचे, असा विचार संस्थेने माहितीपत्रकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोंचविला आहे.

प्रदूषणमुक्त दीपोत्सवाची निर्मित माहितीपत्रकाचे माध्यमातून संस्थेतील आयटीआय, पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी, बीसीए, बीएस्सी, एमएस्सी व पॅरामेडिकल अभ्यासक्रमांच्या वर्गावर्गातून फटाकेमुक्त दिवाळीच नव्हे, तर जबाबदार नागरिकत्वाची व्यापक संकल्पनाही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. वेळेचे नियोजन, विजेची बचत, प्लास्टिकचा वापर टाळणे, पाण्याची बचत व संवर्धन, वाहतुकीचे नियम पाळणे, अन्नाची नासाडी रोखणे, आरोग्याची काळजी घेणे आणि सकारात्मक जीवनशैली अंगीकारणे अशा विविध विषयांवरील मार्गदर्शक सूचनांचाही माहितीपत्रकात समावेश करण्यात आला आहे. या पत्रकांच्या माध्यमातून उद्याच्या समाजासाठी संवेदनशील व सामाजिक भान असलेले नागरिक तयार होतील असा विश्वास संकुल संचालक डॉ. विजय पवार यांनी व्यक्त केला आहे.

गावगाड्यावरील क्रिकेट खेळाडूंनी राज्यस्तरीय क्रिकेटमध्ये निवड होईल यासाठी प्रयत्न करावेत -शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे



अर्धापूर (प्रतिनिधी)– ग्रामीण भागातील क्रिकेटपटूंनी अष्टपैलू व चमकदार कामगिरी करीत राज्यस्तरीय क्रिकेटमध्ये निवड होईल यासाठी मेहनत करावी. तसेच गावगाड्यातील खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन PL प्रीमियर लीग टेबल टेनिस बॉस स्पर्धेचे उद्घाटन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी केले.

PL प्रीमियर लीग सीजन-३ क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. कै. मारोतराव मामा कानोडे क्रीडांगण येथे लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, युवानेते अभिषेक गुरखेल, येळेगाव जि. प. चे सदाशिव कपाटे, नगरसेवक तुकाराम साखरे, भाजपाचे सुरज माडे, अविनाश काळे, प्रसाद कदम यांची उपस्थिती होती. या स्पर्धेची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. प्रथम बक्षीस शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या वतीने ५१००० तर द्वितीय ४१००० हिंदवी क्रिकेट क्लब, अर्धापूर,- तृतीय ३१००० भाजपाचे सूरज माडे पाटील, मॅन ऑफ द सिरीज ५१०० : कै. शकुंतलाबाई टिकमचंद कासलीवार लहानकर यांच्या स्मरणार्थ, बेस्ट बॉलर २१०० श्रीगुरुकृपा ट्रेडर्स अँड हार्डवेअर, फायनल मॅन ऑफ द मॅच रु. १,५०० कदम पान शॉप, बेस्ट विकेटकीपर रु. २,१०० कै. सुमनबाई पंढरीनाथ जाधव यांच्या स्मरणार्थ, बेस्ट कॅच रु. १,५०० अनिल परशराम बाचेवार, ट्रॉफी ज्ञानसाधना सायन्स अँड कॉमर्स अकॅडमी, पिण्याच्या पाण्याची मिनरल वॉटर विनायक लंगडे यांनी केली.

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील अनियमिततेचा आरोप; चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

किनवट (प्रतिनिधी)– किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीतील आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर अनियमितते‌ची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बाजार समितीचे माजी सभापती गजानन मुंढे यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बाजार समितीतील कारभाराबाबत निवेदनात सहा प्रमुख मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. यामध्ये संबंधित कालावधीतील लेखापरीक्षण अहवालातील त्रुटी, बाजार समितीच्या मीटिंग हॉल दुरुस्तीतील कथित गैरव्यवहार आणि बिंदू नामावलीनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात न आल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच बाजार समितीचे सचिव सेवानिवृत्त झाल्यानंतर मुदतवाढ देताना संचालक मंडळाचे मंजुरीपत्र न घेता केवळ सहायक निबंधकांच्या मंजुरीवर कामकाज सुरू ठेवण्यात आल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. संबंधित कालावधीत नियमबाह्य भरती प्रक्रिया राबवून पूर्ण पगार दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

बाजार समितीची जमीन विक्री करताना संचालक मंडळ व सचिवांनी जवळच्या व्यक्तींची नावे बोली प्रक्रियेत टाकून जमीन विक्री केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या व्यवहारामुळे बाजार समितीचे तसेच शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचेही म्हटले आहे.

इनरव्हील क्लब ऑफ नांदेडतर्फे मध्यवर्ती कारागृहातील महिला कैद्यांना १०० ब्लँकेटचे वाटप



नांदेड (प्रतिनिधी)– सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या इनरव्हील क्लब ऑफ नांदेडतर्फे नांदेड येथील मध्यवर्ती कारागृह (वर्ग-२) येथे महिला कैद्यांसाठी ब्लँकेट वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत कारागृहातील महिला कैद्यांना १०० ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

थंडीच्या दिवसांत महिला कैद्यांना उब मिळावी आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात थोडासा दिलासा मिळावा, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी कारागृहाचे अधीक्षक आडे उपस्थित होते. त्यांनी कारागृहाची कार्यपद्धती, तेथील विविध विभाग तसेच कैद्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती क्लबच्या सदस्यांना दिली.

या कार्यक्रमास इनरव्हील क्लब ऑफ नांदेडच्या अध्यक्षा सोनाली देशमुख, सचिव संगीता दंडे, आयपीपी मीनाक्षी पाटील, पास्ट प्रेसिडेंट डॉ. विद्या पाटील आणि शीला हटकर उपस्थित होत्या.

समाजातील गरजू आणि वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे, सामाजिक बांधिलकी जपणे आणि मानवतेची भावना वृद्धिंगत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. इनरव्हील क्लब ऑफ नांदेडच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

केमिस्ट असोसिएशन व साने गुरुजी रुग्णालयाच्यावतीने आज धन्वंतरी पूजन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

किनवट (प्रतिनिधी)– केमिस्ट असोसिएशन किनवट व साने गुरुजी रुग्णालय किनवट यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर २०२६ रोजी धन्वंतरी पूजन व वैद्यकीय विद्याशाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम एम. आय. डी. सी. कोठारी येथील 'साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल' येथे पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासन विभाग नांदेडचे सहायक आयुक्त अशोक राठोड यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अच्युत बन (लेखक, सामाजिक कार्यकर्ते तथा मधुमेह तज्ज्ञ), डॉ. संदीप जन्नावार (माजी अध्यक्ष, किनवट डॉक्टर्स असोसिएशन) आणि डॉ. शारदा चौडेंकर (तहसीलदार, किनवट) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या शैक्षणिक वर्षात एमबीबीएस, बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., डेंटल, फिजियोथेरपी व औषध निर्माणशास्त्र या वैद्यकीय व आरोग्य विद्याशाखांमध्ये प्रवेश घेतलेल्या किनवट शहर व परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात त्यांच्या पालकांसह गौरव करण्यात येणार आहे.

आपल्या गावातील व परिसरातील अशा गुणवंत विद्यार्थ्यांची माहिती साने गुरुजी रुग्णालयाकडे तत्काळ जमा करावी, असे आवाहन डॉ. अशोक बेलखोडे व राजाराम गटलेवार यांच्यावतीने करण्यात आले आहे.

गुरुकुल विद्यालयात 'सुरक्षित बचपन अभियान' संपन्न



धर्माबाद (प्रतिनिधी)– गुरुकुल विद्यालय धर्माबाद येथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी 'सुरक्षित बचपन अभियान' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुल मित्र मंडळ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष पी. एल. गोपतवाड होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून जी. आर. एकाडे, दिवाणी न्यायाधीश, न्यायालय धर्माबाद, ॲड. पूजा चव्हाण, ॲड. गंगाप्रसाद चोपडे तसेच आर. एस. खंदारे, वरिष्ठ लिपीक उपस्थित होते.

या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बालसुरक्षेचे महत्त्व, बालकांचे हक्क, बालकांवरील अन्याय व अत्याचारांपासून संरक्षण आणि कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी योग्य मदत कशी घ्यावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. बालकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, त्यांच्यामध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि स्वतःच्या हक्कांविषयी सजग करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी बाल-सुरक्षेविषयी जागरूक राहण्याचा संदेश घेतला. शाळा आणि समाज यांनी एकत्रितपणे बालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लासीनकर बी. एच तर आभार मुख्याध्यापक कदम एम. एस. यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक वृंदांनी प्रयत्न केले.

तालुका व मंडळ स्तरावर विशेष लोक अदालतीचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)– क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यात १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यात गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी तालुका व मंडळ स्तरावर विशेष महसूल लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तसेच अपर जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनीशी संबंधित विविध महसुली दावे व अपिले प्रलंबित असतात. ही प्रकरणे अनेक वर्षे प्रलंबित राहिल्याने संबंधित पक्षकारांचा वेळ व पैसा खर्च होतो. या पार्श्वभूमीवर परस्पर संमतीने व तडजोडीच्या माध्यमातून प्रकरणांचा जलद निपटारा करणे, पक्षकारांची वेळ व पैशांची बचत करणे आणि महसूल यंत्रणेवरील प्रलंबित प्रकरणांचा ताण कमी करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या लोकअदालतीमध्ये मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) व अपर जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या विविध प्रकारच्या महसुली दाव्यांचा व अपिलांचा समावेश असेल. संबंधित पक्षकारांनी परस्पर संमतीने किंवा आपल्या वकिलामार्फत विहित 'प्रपत्र-अ' मधील तडजोडनामा अर्ज संबंधित न्यायालयात सादर करावा. प्राप्त अर्जांची छाननी करून दोन्ही पक्षकारांच्या संमतीची खात्री करण्यात येईल. त्यानंतर कायदेशीर तडजोडनामा तयार करून लोक अदालतीमध्ये दोन्ही पक्षांच्या सहमतीने अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

नांदेड जिल्ह्यातील चार गोशाळांची क्षेत्रीय पाहणी

- दुष्काळी परिस्थितीत पशुधन संरक्षणासाठी चारा व्यवस्थापनावर भर
- मुरघास निर्मिती, चारा साठवणूक व पशुधन संगोपनाचा घेतला आढावा
- गोशाळांना शास्त्रीय व्यवस्थापनाबाबत केले मार्गदर्शन



नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता, साठवणूक आणि शास्त्रीय संगोपन व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील चार गोशाळांना क्षेत्रीय भेट देऊन पाहणी करण्यात आली.

जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मुदखेड तालुक्यातील कोल्हा येथील श्री गोवर्धन गोसेवा प्रकल्प, धर्माबाद येथील श्री पंच कमेटी गोरक्षण संस्था व श्री सिद्धेश्वर गोवत्स गोशाळा तसेच हिमायतनगर तालुक्यातील पवना येथील देवकृपा गोशाळा तथा गोविज्ञान केंद्राची पाहणी केली. यावेळी पशुधनाचे आरोग्य, संगोपन, हिरवा व वाळलेला चारा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि चारा साठवणूक व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला.

पाहणी दरम्यान धर्माबाद येथील श्री पंच कमेटी गोरक्षण संस्थेकडे पुढील सुमारे आठ महिने पुरेल इतका वाळलेला चारा उपलब्ध असल्याचे आढळले. श्री सिद्धेश्वर गोवत्स गोशाळेत कडबा व भाताच्या तणसाचा साठा तसेच गोमयापासून गोकाष्ठ निर्मितीचा उपक्रम सुरू असल्याचे निदर्शनास आले. पवना येथील देवकृपा गोशाळेत हिरव्या मक्यापासून ५० टन आणि ऊसापासून १० टन, असा एकूण ६० टन मुरघास तयार करून साठविण्यात आला आहे. हा उपक्रम दुष्काळी परिस्थितीतील चारा व्यवस्थापनाच्या दृष्टीने अनुकरणीय असल्याचे दिसून आले.

यावेळी उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने व शास्त्रीय पद्धतीने वापर, संतुलित पशुआहार, खनिज मिश्रण, स्वच्छ पाणी आणि नियमित पशुवैद्यकीय सेवा याबाबत गोशाळा व्यवस्थापनाला मार्गदर्शन करण्यात आले. तसेच महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी, गोशाळा परिपोषण योजनेचा लाभ आणि गोमयाच्या मूल्यवर्धनाबाबतही आवश्यक सूचना देण्यात आल्या. या पाहणीमध्ये सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, डॉ. ईश्वर हंगरगे तसेच संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी चारा साठवणूक, मुरघास निर्मिती आणि शास्त्रीय पशुधन व्यवस्थापनाला प्राधान्य देण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील प्रश्नांवर आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधले

मातूळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाची तांत्रिक चौकशी करण्याची संचालक इंजि. विश्वंभर पवार यांची मागणी



भोकर (प्रतिनिधी)– नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील विविध समस्यांना वाचा फोडत शिवसेनेचे भोकर विधानसभा प्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इंजि. विश्वंभर पवार यांनी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी मातूळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामातील कथित निकृष्ट दर्जासह जिल्ह्यातील आरोग्य सुविधांमधील त्रुटी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची अनियमित उपस्थिती, औषधांचा तुटवडा आणि रेबीज प्रतिबंधक लसींच्या अनुपलब्धतेसारखे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले.

मातूळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत नुकतेच दैनिक गोदातीर समाचार माध्यमातून प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. तसेच इमारतीसोबत बांधण्यात आलेली कर्मचारी निवासस्थाने दोन ते तीन वर्षांपासून वापराविना पडून असल्याची बाबही समोर आली होती. या पार्श्वभूमीवर मातूळ आरोग्य केंद्राच्या बांधकामाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करून मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च, बांधकामाचे मोजमाप, वापरलेले साहित्य आणि संबंधित कंत्राटदार व अभियंत्यांची भूमिका तपासण्याची मागणी करण्यात आली.

ग्रामीण भागातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर व कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी येत आहेत. काही ठिकाणी आवश्यक औषधांचा साठा अपुरा असून, कुत्रा चावल्यानंतर आवश्यक असणारी रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचा मुद्दाही आरोग्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला.

हिवाळी-२०२६ पदवी परीक्षेची प्रवेशपत्रे महाविद्यालयांना वितरित

नांदेड (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ पदवी परीक्षांना येत्या १७ नोव्हेंबर २०२६ पासून सुरुवात होणार आहे. या परीक्षांची प्रवेशपत्रे विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे वेळेत डाउनलोड करून विद्यार्थ्यांना वितरित करावीत, असे निर्देश विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी प्रवेशपत्र उपलब्ध होईल, याची महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी. तसेच विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत, शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी सहकार्य करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र-संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

नांदेडच्या भूमिकन्येचा राष्ट्रीय सन्मान!

स्वाती चौहान-ठक्कर यांची भारतीय रेडक्रॉस सोसायटीच्या राष्ट्रीय व्यवस्थापन मंडळावर नियुक्ती



नांदेड (प्रतिनिधी)- नांदेडच्या भूमिकन्या तथा माजी न्यायाधीश स्वाती अभय चौहान-ठक्कर यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर मानाचा बहुमान प्राप्त केला आहे. भारतीय रेडक्रॉस सोसायटीच्या राष्ट्रीय व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे नांदेडच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

भारतीय रेडक्रॉस सोसायटीच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयातून ३ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या अधिकृत नियुक्तीपत्रानुसार, भारतीय रेडक्रॉस सोसायटी कायदा १९२० मधील कलम ४B (१) (B) अन्वये भारताचे राष्ट्रपती तथा भारतीय रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्ष यांच्या वतीने त्यांची राष्ट्रीय व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचा कार्यकाळ १५ ऑक्टोबर २०२७ पर्यंत राहणार असल्याचे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. भारतीय रेडक्रॉस सोसायटीचे सरचिटणीस ललित वाधवा यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्तीपत्र जारी करण्यात आले आहे.

देशातील आपत्तीग्रस्त, गरजू, वंचित आणि असुरक्षित घटकांच्या मदतीसाठी कार्यरत असलेल्या भारतीय रेडक्रॉस सोसायटीच्या राष्ट्रीय व्यवस्थापन मंडळावर सदस्य म्हणून काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. देशातील मानवतावादी सेवाकार्याला दिशा देणे, संस्थेच्या कार्याला मार्गदर्शन व सहकार्य करणे आणि समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचे कार्य अधिक प्रभावीपणे पोहोचविणे या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

न्यायक्षेत्रातील अनुभव, सामाजिक जाणीव, सार्वजनिक जीवनातील योगदान आणि मानवतावादी दृष्टिकोन यांच्या बळावर स्वाती चौहान-ठक्कर यांनी मिळविलेला हा राष्ट्रीय सन्मान नांदेडकरांसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल नांदेड जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सेवाभावी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील राष्ट्रीय सेवाकार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

॥ भावपूर्ण प्रथम पुण्यस्मरण ॥



कै. ईश्वर राजन्ना तुंगेनवार

बाबा, तुमच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त तुमच्या पवित्र स्मृतीस कृतज्ञतापूर्वक नमन!

॥ स्मरणात सदैव संपूर्ण परिवार ॥

सौ. मनोरमा तुंगेनवार (पत्नी), राजश्री अशोक गिरगिरवार (मोठी मुलगी), डॉ. राजेश तुंगेनवार (मुलगा), संध्या संतोष संगेवार (मुलगी), सारिका राजेश गटलेवार(मुलगी), स्मिता तुंगेनवार(मुलगी)

नातवंडे : योगेश, स्वयंभू आणि श्रेया

॥ आपल्या लाडक्या बाबांच्या पवित्र स्मृतीस संपूर्ण परिवाराकडून कृतज्ञतापूर्वक नमन! ॥

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308

जीवेत शरदः शतम्



आमचे स्नेही तथा सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष,व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको प्रभागाचे माजी नगरसेवक

अॅड श्रीनिवास नानासाहेब जाधव

यांच्या वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छूक-

प्राचार्य डॉ.सुरेश घुले

व शिक्षकेतर कर्मचारी महात्मा गांधी बिएड कॉलेज सिडको व सावित्रीबाई फुले महिला अध्यापक महाविद्यालय वसरणी नांदेड

जीवेत शरदः शतम्



आमचे स्नेही तथा सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष,व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको प्रभागाचे माजी नगरसेवक

अॅड.श्रीनिवास नानासाहेब जाधव

यांच्या वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा



-शुभेच्छूक-

मुख्याध्यापक राऊत एस.व्ही.

सहशिक्षक-श्रीमती मामीडवार एस.एल.,श्री घोणसे,एस.एन, ऊपलेचंवार एम.एम, राठोड एस. आर, पाटील एन.डि, केंद्रे आर.डी,कबीर एस आर, मुसळे ए. एन,व सर्व कर्मचारी वृंद महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय सिडको नवीन नांदेड

जीवेत शरदः शतम्



सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष, व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको प्रभागाचे माजी नगरसेवक

अॅड श्रीनिवास नानासाहेब जाधव

यांच्या वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा



-शुभेच्छूक-

प्राचार्य डॉ.एन.जी.पाटील

व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको नवीन नांदेड.



Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com